**गुरुपुरब सोहळा उत्साहात** • देहरादून येथील ग्यानी बलविंदर सिंघजी यांचे मार्गदर्शन; तीन दिवसीय धार्मिक उत्सवाचा समारोप

# मानवतेचा धर्म अंगीकरून सकारात्मकता शोधा

**प्रतिनिधी** | इंदिरानगर



गुरु गोबिंद सिंघजी यांची शिकवण म्हणजे घराच्या दरवाज्यावर लावलेला दिवा आहे, जो घराच्या आतही प्रकाश देतो अन् घराच्या बाहेरही प्रकाश देतो. मानवाचे अंतर्मनही अंतर्बाह्य प्रकाशमान करण्यासाठी त्यांची शिकवण आजही हरप्रकारे आपल्याला मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन देहरादून येथील ग्यानी बलविंदर सिंघजी यांनी केले. गुरु गोबिंदसिंघ फाउंडेशनद्वारा सुरू असलेल्या गुरपूरब सोहळ्यात त्यांनी भक्तांशी संवाद साधला.

इंदिरानगरातील पाथर्डी फाटा ते वडाळा नाका या दरम्यान असलेल्या गुरु गोबिंदसिंघ शैक्षणिक संस्था तथा फाऊंडेशनमध्ये गुरू गोबिंदसिंग यांचा जयंती उत्सव सोहळा रविवारी पूर्ण झाला. तीन दिवसीय सोहळा होता. यात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील गुरुद्वारात रोजच प्रवचन झाले. ग्यानी बलविंदर सिंघजी यांनी भक्ती अन् परमार्थ याचे महत्व सांगून जीवन जगण्यासाठीचा मंत्र दिला. गुरपूरब सोहोळ्यात सुवर्ण मंदिर श्री अमृतसर येथील भाई इंद्रजीत सिंघजी खालसा यांनीदेखील आपली कीर्तन सेवा अर्पण केली. गुरु नानकजी आणि गुरु गोबिंद सिंघजी यांची शिकवण अमलात आणून मनुष्याने सतमार्गावर चालावे, गुरुची शिकवण मनुष्याला नेहमीच सर्वांगीण विकासाला पोषक ठरते असे ग्यानी बलविंदर सिंघ यांनी आपल्या कीर्तनद्वारे सांगितले. ग्यानी बलविंदर सिंघजी पुढे म्हणाले, गुरु गोबिंद सिंघजी यांनी आयुष्यभर एकाच सिद्धांताचे पालन केले जो त्यांना त्यांचे वडील हुतात्मा-शिरोमणि गुरु तेगबहादुर यांनी शिकवला होता- 'अनेकदा महान योद्धा हा कठोर मनाचा आहे, असे मानले जाते. पण गुरु गोबिंद सिंग तर एवढे दयाळू होते की, युद्धभूमीवर आपल्या घायाळ झालेल्या शत्रूला पाणी पाजण्याचा आणि त्यांच्या जखमांवर मलमपट्टी करण्याचा आदेश त्यांनी आपल्या सेवकांना दिला होता. गुरु गोबिंद सिंघ महाराज हे त्यागाची मूर्ती होते. सर्व मानवांवर प्रेम करा आणि सर्व शक्य मार्गांनी त्यांची सेवा करा. अशाने सौहार्दपूर्ण वातावरणाची निर्मिती होईल, असेही ग्यानी बलविंदर सिंघजी यांनी आपल्या विशेष मार्गदर्शक व्याख्यानात संगितले. गुरु गोबिंद सिंघ फाऊंडेशनचे अध्यक्ष गुरदेव सिंघ बिर्दी, मुख्य कार्यकारी अधिकारी परमिंदर सिंग, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, फाउंडेशनच्या सर्व शैक्षणिक संस्थेचे कर्मचारी तसेच शीख बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





गुरुपुरब सोहळ्यात भजन म्हणताना विद्यार्थिनी. दुसऱ्या छायाचित्रात संस्थेतील गुरूद्वारासमोर काढण्यात आलेली रंगिबेरंगी फुलांपासूनची भव्य रांगोळी



## गुरूंच्या शिकवणीतून सर्वांगीण विकास

गुरपूरब सोहळयात सुवर्ण मंदिर, श्री अमृतसर येथील भाई इंद्रजीत सिंघजी खालसा यांनीदेखील आपली कीर्तन सेवा अर्पण केली. गुरु नानकजी आणि गुरु गोबिंद सिंघजी यांची शिकवण अमलात आणून मनुष्याने सतमार्गावर चालावे, गुरुची शिकवण मनुष्याला नेहमीच सर्वांगीण विकासाला पोषक ठरते असे त्यांनी आपल्या कीर्तनद्वारे सांगितले. गुरपूरब मधील खालसा कॅम्प अंतर्गत सुरू कार्यक्रमात गुरु गोबिंद सिंघ जी यांच्या जीवनावर आधारित कथांचे सादरीकरण पॉवरपॉइंटद्वारा करण्यात आले. पाककला स्पर्धा, पगडी आणि दुमाला बांधणे स्पर्धादेखील झाल्या. या उत्सवात तिन्ही दिवस दोनवेळेस लंगर ( महाप्रसाद ) आयोजिला.

## पॉवर पॉइंटद्वारा कथा

गुरपूरबमधील खालसा कॅम्प अंतर्गत सुरू कार्यक्रमात गुरु गोबिंद सिंघजी यांच्या जीवनावर आधारित कथांचे सादरीकरण पॉवरपॉइंटद्वारा करण्यात आले. तसेच पाककला स्पर्धा, पगडी आणि दुमाला बांधणे स्पर्धा याचे देखील आयोजन करण्यात आले. तीन दिवसीय कार्यक्रमासाठी ट्रस्टी, शिख बांधव, संस्थेचे कर्मचारी, अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# गुरुनानक प्रकाशपुरब वर्षानिमित्त मोफत कॅन्सर तपासणी शिबीर आज

**प्रतिनिधी** | नाशिक

शिखांचे आद्यगुरू गुरुनानक देवजी महाराज यांच्या ५५० व्या प्रकाशपुरब वर्षानिमित्ताने नाशिकच्या गुरुनानक देवजी सेवा असोसिएशनच्यावतीने शनिवार, दि. २५ मे रोजी इंदिरानगर येथील गुरुगोविंदसिंग फाऊंडेशन संचालित इंजिनीअरिंग कॉलेजच्या सभागृहात मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरास मुक्ता कॅन्सर क्लिनिकचे डॉ. मुकुल अरविंद घारोटे कॅन्सर या रोगाविषयीचे समाज गैरसमज या विषयावर प्रबोधन करणार आहेत. शिबीर सकाळी ११.०० ते १२.३० दरम्यान होणार असून त्यानंतर सर्वांसाठी जेवणाची (लंगर) व्यवस्था केलेली आहे. सर्वांसाठी मोफत असलेल्या या शिबिरात महिलांसाठी पॅप स्मेअर टेस्ट व मॅमोग्राफी टेस्टसाठी मोफत कुपन्स दिले जातील. शिबिरास जाण्या-येण्यासाठी पंचवटी, नाशिकरोड, सातपूर, देवळाली कॅम्प येथील गुरुद्वारातून बसेसची मोफत सेवा ठेवली आहे.

अधिक माहितीसाठी रवींद्र कौर पानफेर - ,९४२३९६७३६१, परमिंदर सिंग - 9967064740 ९९६७०६४७४० यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन गुरुनानक देवजी सेवा असोसिएशनच्यावतीने करण्यात आले आहे.

# मोफत आरोग्यनिदान शिबिराचे आयोजन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

शहरातील गुरुनानक देवजी सेवा असोसिएशनतर्फे गुरुनानक देवजी यांचे ५५० वे प्रकाशपर्व पूर्ण वर्षभर सामाजिक, धार्मिक कार्यक्रम, मोफत आरोग्य निदान शिबिर अशा विविध कार्यक्रमांद्वारे साजरा करण्यात येणार आहे. ऑडिटोरियम हॉल, डिग्री कॉलेज, गुरू गोविंदसिंग फाउंडेशन येथे आज (२५ मे) सकाळी ११.३० ते दुपारी

**सोशल कनेक्ट**

१२.३० या वेळेत हे शिबिर होणार आहे.

'कर्करोग-मिथक आणि तथ्य' हे कर्करोग जागरुकतेबाबत विशेष आरोग्य निदान शिबिर आयोजित करण्यात आले असून, या शिबिरामध्ये डॉ. मुकुल अरविंद घरोटे मार्गदर्शन करणार आहेत. कर्करोगाचे निदान प्रथम टप्प्यातच कसे करता येईल त्यासाठी त्याची लक्षणे कशी ओळखावीत, कर्करोगापासून कसा बचाव करता येईल याबाबत डॉ. घरोटे मुक्त संवाद साधणार आहेत. या शिबिरात महिलांसाठी मोफत पॅप स्मिअर टेस्ट आणि मॅमोग्राफी टेस्टदेखील करण्यात येणार आहेत.

# गुरूगोविंद सिंग अभियांत्रिकीमध्ये सेतू सुविधा केंद्र सुरू

**प्रतिनिधी** | इंदिरानगर

शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रभूत प्रवेशासाठी बारावी बोर्डाची परीक्षेचा निकाल जाहीर झालेला असून विद्यार्थी आता विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी वाट बघत आहेत. आता प्रतीक्षा संपलेली असून दि. ६ जून रोजी महाराष्ट्र शासन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष विभागाने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी सेतू केंद्रांची यादी http://www.mahacet.org/ या संकेतस्थळावर जाहीर केली आहे. यादीत गुरूगोविंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नावाचा समावेश केला गेला आहे.

तंत्रशिक्षण, उच्चशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आयुष, कृषी शिक्षण, मत्स्य व दुग्ध, कला शिक्षण या विभागांतर्गत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेसाठी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन / समुपदेशन आणि मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी शुक्रवार (दि. ७) पासून विविध ठिकाणी सेतू सुविधा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. सोमवारी (दि. १०) सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या वतीने प्रवेशप्रक्रियेबाबत या क्षेत्रातील तज्ज्ञांद्वारे मोफत मार्गदर्शन करण्यात येईल, असे प्राचार्य डॉ. नीळकंठ निकम यांनी कळविले आहे.

**दिव्य मराठी विशेष** • संशोधक डॉ. अविनाश चंदर यांची माहिती; गुरुगोबिंदसिंग अभियांत्रिकी संशोधन केंद्राच्या विद्यार्थ्यांशी संवाद

# आंतरराष्ट्रीय कराराचे उल्लंघन न करता 'मिशन शक्ती' यशस्वी

प्रतिनिधी | इंदिरानगर

युद्धपरिस्थितीत शत्रू देशांचे अंतराळातले उपग्रह पाडण्याची क्षमता आता भारताकडे आहे. आंतराष्ट्रीय कराराचं उल्लंघन न करता भारताच्या संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओने 'मिशन शक्ती' हे अंतराळ अभियान यशस्वी केले असल्याचे प्रतिपादन मिशन शक्ती अंतराळ या अंतराळ अभियानात मुख्य भूमिका बजावणारे पद्मश्री तथा संशोधक डॉ. अविनाश चंदर यांनी गुरु गोबिंदसिंग अभियांत्रिकी आणि संशोधन केंद्राच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना केले.

संरक्षण संशोधन आणि अभियांत्रिकी शिक्षणात असणाऱ्या संधींबाबत मार्गदर्शन करताचा चंदेल यांनी आपले विचार मांडले. अनेक संधी या तरुणांना या संशोधन क्षेत्रात असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अविनाश चंदर यांचा परिचय गुरु गोबिंदसिंग संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी परमिंदरसिंग यांनी उपस्थितांना करून दिला. प्रशिक्षण आणि आस्थापना विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीप्ती अंकलगी यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम यांनी मानले. डॉ. चंदर म्हणाले की, पृथ्वीभोवती फिरणाऱ्या कृत्रिम उपग्रहाला नष्ट करू शकेल अशा क्षेपणास्त्राला उपग्रहभेदी क्षेपणास्त्र (ए सॅट) म्हणतात. ते प्रामुख्याने पृथ्वीभोवती दोन हजार किलोमीटरपर्यंतच्या कक्षेत फिरणाऱ्या लष्करी उपयोगाच्या उपग्रहांचा वेध घेण्यासाठी विकसित केले



जाते. भविष्यातील युद्धे ही जमीन, पाणी आणि हवेसह अवकाशातही लढली जातील असे मानले जाते. लष्करासाठीही उपग्रह अत्यंत महत्त्वाचे असतात. शत्रूवर सतत नजर ठेवण्यापासून, युद्ध काळात हल्ले करण्यासाठी लष्कर उपग्रहांवर अवलंबून असते. अशा स्थितीत शत्रू देशांच्या उपग्रहांचा वेध घेऊन त्या राष्ट्राची दळणवळण यंत्रणा, दूरसंवेदन सुविधा नष्ट करण्यासाठी 'ए सॅट' विकसित केले जाते. शत्रू राष्ट्रांचे उपग्रह नष्ट करण्यासाठी ए सॅटचा उपयोग होऊ शकतो. यावेळी प्राचार्य डॉ. नीलकंठ निकम, उपप्राचार्य डॉ. शामकुमार काळपांडे, कुलसचिव मनोज कोळी, विभागप्रमुख उपस्थित होते.

### डॉ.कलामांचे स्वप्न साकार करा

माझ्या तरुण विद्यार्थी मित्रांनो आपण अभियांत्रिकी क्षेत्रातील संशोधनाच्या कक्षा रुंद करा. स्वतःची क्षमता सिद्ध करून थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांच्या स्वनातील २०२०मधील विकसित भारत साकारा. नवीन तंत्रज्ञान नक्कीच तुम्हाला उपयोगी पडेल असे आवाहन डॉ. चंदर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. अनेक उपग्रहांची माहिती त्यांनी दिली.

### 'ए सॅट' मुळे भारत देश स्वयंपूर्ण

शत्रूकडून अवकाशातून झालेले क्षेपणास्त्र हल्ले रोखण्यासाठीही ही क्षेपणास्त्र यंत्रणा उपयोगी पडू शकते. अण्वस्त्रे घेऊन देशाकडे येणारी शत्रूची क्षेपणास्त्रे जमिनीपासून १५० किलोमीटर उंचीवर नष्ट करण्याची 'ए सॅट' या आधुनिक उपग्रहाची क्षमता आहे. भारताने केलेल्या या चाचणीमुळे आपण जगभरात आपली सक्षमता सिद्ध केली आहे.

दैनिक दिव्य मराठी
20-Jun-2019
नाशिक सिटी Page 8





दहावी व बारावीत ९० टक्के गुण मिळविलेल्या सत्कारार्थी विद्यार्थ्यांसोबत पोलिस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, सरदार गुरुदेवसिंग बिरदी, परमिंदर सिंग, शिल्पा सराफ आदी.

**विद्यार्थी गुणगौरव** • गुरुगोबिंदसिंग फाउंडेशन व 'दिव्य मराठी'च्या समारंभात विश्वास नांगरे-पाटील यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

# आभासी जगातल्या राक्षसापासून दूर रहा, इच्छाशक्ती सोडू नका

प्रतिनिधी | नाशिक

विद्यार्थी जीवनामध्ये जिद्द आणि इच्छाशक्ती योग्य ध्येयापर्यंत नेण्यास कारणीभूत ठरते. तुमचा प्रवास रंगतदार असावा, त्यासाठी हार मानून चालणार नाही. संघर्षाला खरा अर्थ प्राप्त होतो तो जिद्दीने हे लक्षात ठेवून संघर्षाला घाबरू नका. शिवाय सध्या इंटरनेटने उभ्या केलेल्या आभासी विश्वातील राक्षसापासून लांब रहा, म्हणजे ध्येय भरकटणार नाही, असा मोलाचा सल्ला नाशिकचे पोलिस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला.

गुरुगोबिंदसिंग फाउंडेशन आणि 'दिव्य मराठी' यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी आणि बारावीच्या गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. गुरुगोबिंद सिंग तंत्रनिकेतनमध्ये बुधवारी (दि.१९) सकाळी हा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधन केले. त्यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंदांनी सांगितल्याप्रमाणे आदर्श युवकाने संघर्ष करत ध्येय गाठेपर्यंत थांबायचे नसते. रस्त्यात कितीही अडथळे आले तरी त्यांना सामोरे जात ध्येय गाठायचे. आयुष्यात प्राधान्यक्रम ठरवायला हवा, अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करायला हवी हे सांगताना त्यांनी हनुमानाचा सीतेपर्यंत श्रीरामांची अंगठी घेऊन जातानाचा प्रवास उदाहरणादाखल सांगितला. यानंतर टीन एज म्हणजेच किशोरवयात असताना येणाऱ्या प्रलोभनांना आयुष्यामध्ये विष कालवू देऊ नका असा-देखील सल्ला दिला.

यानंतर बोलताना संस्थेचे अध्यक्ष सरदार गुरुदेवसिंग बिरदी यांनी विद्यार्थ्यांना सन्मार्गाने विद्या ग्रहण करण्याचा सल्ला दिला. चांगल्या मार्गाने मिळविलेल्या गोष्टी आयुष्यामध्ये उच्च शिखर गाठण्याची पायरी ठरतात असेही ते म्हणाले. याशिवाय संस्थेचे सीईओ परमिंदर सिंग यांनी विद्यार्थ्यांना दहावीनंतर योग्य मार्ग निवडण्यासाठी चिंतन करण्याची गरज असते. त्याचबरोबर योग्य मार्गदर्शनही महत्त्वाचे आहे, असे सुचविले.

कार्यक्रमाच्या व्यासपिठावर संस्थेचे अध्यक्ष गुरुदेवसिंग बिरदी, पोलिस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, संस्थेचे सीईओ परमिंदर सिंग, पीएमसी बँकेच्या व्यवस्थापिका शिल्पा सराफ, 'दिव्य मराठी' चे निवासी संपादक जयप्रकाश पवार, डेप्युटी एडीटर अभिजित कुलकर्णी, युनिट हेड झुबेर मलिक आदी मान्यवर उपस्थित होते.

### यांच्यासह अन्य ८० विद्यार्थ्यांचा झाला कार्यक्रमात सत्कार

यना रिषभ पटवा (८८), मुस्कान अल्ताफ शेख (८४.१५), रॉय विशाल प्रकाश (८५.५), दिव्या सुरेश चौधरी (८१.८५), मौसमी संतोष पाटील (८२.९५), प्रीती सोमनाथ गायखे (८५.८५), संज्योत कैलास गायधनी (८०.७७), धैर्यशील निकम (८७.२०), गगनदीप सिंग (८२.३१) यांच्यासह अन्य ८० विद्यार्थ्यांचा सत्कार केला गेला.

### यांचाही गौरव

दहावीच्या विद्यार्थ्यांमध्ये आकांक्षा निसाळ (९७.२), कादंबरी झांबरे (९४) आणि गुरुगोविंद सिंग पॉलिटेक्निकच्या नदिम शेख (९२.११), यश राऊत (९४.१३), कुवर प्रतीक (९१.८८) यांचाही सत्कार केला गेला.